# २. आपली अनुज्ञप्ती (मोटार ड्रायव्हिंग लायसन्स) कशी मिळवाल

## १. शिकाऊ लायसन्स :



आपण मानसिक, नैतिक व शारिरीकदृष्टया सक्षम असल्यास आणि आपल्या वयाची १८ वर्षे पूर्ण केली असल्यास, आपले पासपोर्ट आकाराचे तीन फोटो, आपल्या वयाचा व निवासी पत्त्याचा पुरावा आपल्या कार्यक्षेत्रातील आर.टी.ओ. कार्यालयात जाऊन सादर केल्यानंतर आवश्यक चाचणी परीक्षा पास झाल्यावर वाहनाचे शिकाऊ लायसन्स आपणास मिळते. १६ वर्षा खालील कोणालाही ड्रायव्हिंग लायसन्स दिले जात नाही. परंतु १६ वर्षावरील व १८ वर्षाखालील अर्जदारास त्यांच्या पालकांचे संमतीपत्र सादर केल्यास गिअर नसलेल्या व ५० सी. सी. पेक्षा कमी इंजिन क्षमता असलेल्या दुचाकी वाहनासाठी शिकाऊ लायसन्स दिले जाते. सदर शिकाऊ लायसन्स दिलेल्या तारखेपासून फक्त ६ महिने वैध असते. ह्याचे नुतनीकरण करता येते.

## २. पक्के लायसन्स :

शिकाऊ लायसन्स काढून ३० दिवस पूर्ण झाले असतील तर आपण आपले सुस्थितीतील वाहन व त्या वाहनांच्या वैध कागदपत्रांसह आर.टी.ओ. कार्यालयात जाऊन पक्क्या लायसन्ससाठी चाचणी देऊ शकता. उत्तीर्ण झाल्यावर आपणांस हव्या असलेल्या वाहन वर्गाचे पक्के लायसन्स मिळेल. सदर लायसन्स खाजगी वाहनासाठी असेल तर ते दिलेल्या तारखेपासून २० वर्षे किंवा आपल्या वयाच्या ५० वर्षापर्यंत जी तारीख अगोदर येईल त्या तारखेपर्यंत वैध असते व जर हे

लायसन्स सार्वजनिक व ट्रान्सपोर्ट वाहनासाठी असेल तर ते फक्त तीन वर्ष वैध असते.

## ३. आंतरराष्ट्रीय वाहनचालक परवाना :

आपले वैध पक्के लायसन्स, पासपोर्ट आकाराचे ३ फोटो व वैध पासपोर्ट, विहित नमुन्यातील अर्जासह रु.२००/-फी सह आर.टी.ओ. कार्यालयातील अधिकाऱ्यांना सादर केल्यास आपणांस दिलेल्या तारखेपासून एक वर्षासाठी आंतरराष्ट्रीय वाहनचालक परवाना मिळू शकतो. सदर परवान्याचे नुतनीकरण करता येत नाही व ह्याची दुय्यम प्रतही दिली जात नाही.

## ४. पक्के लायसन्सवर इतर वाहन वर्गाची नोंद करणे :

आपणांस पक्क्या लायसन्सवर दुसऱ्या वाहन वर्गाची नोंद करवून घ्यावयाची असल्यास त्या वर्गाचे शिकाऊ लायसन्स काढून ३० दिवसानंतर आर.टी.ओ. कार्यालयात जाऊन चाचणी दिल्यास त्या वाहन वर्गाची नोंद आपल्या पक्क्या लायसन्सवर करवून घेता येईल.

पेट्रोलियम पदार्थ किंवा धोकादायक रसायनांची वाहतूक करणारी वाहने चालविण्यासाठी चालकांना आपल्या लायसन्सवर या संवर्गातील वाहने चालविण्याची विशेष नोंद करुन घ्यावी लागते. या विषयीचे अभ्यासक्रम चालविण्यासाठी रासायनिक किंवा पेट्रोलियम कंपन्यांना अथवा तांत्रिक शिक्षण संस्थांना शासनातर्फे मान्यता देण्यात येते. अशा मान्यताप्राप्त संस्थाकडून प्रथम वेळी तीन दिवसाचा अभ्यासक्रम पूर्ण करणा-या चालकांना त्यांच्या अनुज्ञप्तीवर पेट्रोलियम किंवा धोकादायक पदार्थांची वाहतूक करण्याविषयीची विशेष नोंद करुन देण्यात येते. त्यानंतर प्रतिवर्षी अशा चालकांना एक दिवसाचा उजळणी अभ्यासक्रम पार पाडणे गरजेचे आहे.

## ५. लायसन्सची दुय्यम प्रत घेणे :

पक्के लायसन्स गहाळ झाले असल्यास आर.टी.ओ. कार्यालयात जाऊन विहित नमुन्यातीलल LLD नमुना व पासपोर्ट आकाराचे २ फोटो आणि रु २०/- भरल्यास आपणांस आपल्या पक्क्या लायसन्सची दुय्यम प्रत मिळेल.

## ६. लायसन्सचे नुतनीकरण करणे :

पक्क्या लायसन्सची ग्राह्यता संपण्या अगोदर ३० दिवस व नंतर ३० दिवस, ह्या कालावधीत आपण आपल्या लायसन्सचे नुतनीकरण करु शकतो. विहीत कालवधीनंतर नुतनीकरण केल्यास आपणास रु. ३०/- जादा शुल्क भरावा लागतो.

## ७. वाहन चालकाने पाळावयाचे महत्त्वाचे नियम :

(१) वाहन चालकाने रस्त्यावरील वाहतूक चिन्हांचे पालन केले पाहिजे. चालकाने दुसऱ्याला अडथळा होईल अशाप्रकारे सार्वजनिक ठिकाणी वाहन उभे करु नये.

(२) चालकाने वाहनाच्या पायफळीवरुन किंवा आतील बाजू व्यतिरिक्त इतर ठिाणी कोणाही व्यक्तीला प्रवास करु देऊ नये. वाहन चालविण्यास चालकाला अडथळा होईल अशाप्रकारे कोणतीही व्यक्ती अथवा वस्तू वाहनात ठेऊ नये. चालकाने वाहन घरंगळणार नाही किंवा अचानक सुरु होणार नाही याची पूर्ण दक्षता घेऊन वाहन उभे करावे.

(३) दुचाकी वाहन चालविणाऱ्या चालकाने दुचाकीवर मागील आसन व्यवस्थित असेल तर त्यावरुन एकापेक्षा जास्त व्यक्तींना नेऊ नये.

(४) चालकाने वाहनाचे इंजिन बंद करुन किंवा न्यूट्रल गीयरमध्ये उतारावरुन वाहन उतरवू नये.

(५) **ज्या रेल्वे क्रॉसिंगवर रक्षक नाही तेथे चालकाने दोन्ही बाजूने रेल्वे येत नाही याची पूर्ण खात्री करुन घ्यावी व त्यानंतरच रेल्वे रुळ ओलांडावे.**



# लायसन्स

१. शिकाऊ लायसन्स

↓

रितसर अर्ज

↓

शुल्क रुपये ३०/-

↓

सहायक मोटार वाहन निरीक्षक/मोटार वाहन निरीक्षक

↓

विधीग्राह्य—६ महिने व ३० दिवसानंतर पक्के लायसन्सकरीता अर्ज करु शकतो

२. पक्के लायसन्स

↓

रितसर अर्ज

↓

चाचणी शुल्क रुपये ५०/-

↓

मोटार वाहन निरीक्षक/सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी

↓

पक्के लायसन्स फी रुपये ४०/-

↓

विधीग्राह्यता (खाजगी वाहनासाठी) दिलेल्या दिवसांपासून २० वर्ष अथवा वयाच्या ५० वर्ष जी तारीख अगोदर असेल ती तारीख

↓

विधीग्राह्यता ट्रान्सपोर्ट वाहनासाठी ३ वर्षे

↓

नुतनीकरण

↓

रितसर अर्ज विहित मुदतीत रु. ३०/-

↓

ग्राह्य तारखेच्या ३० दिवसानंतर रु. ३०/- जादा शुल्क.

↓

वरिष्ठ लिपिक/मुख्य लिपिक

दुय्यम लायसन्स

↓

रितसर अर्ज शुल्क रु. २०/-

↓

वरिष्ठ लिपिक/मुख्य लिपिक

३. आंतरराष्ट्रीय वाहन चालक परवाना

↓

रितसर अर्ज - शुल्क रु. २००/- वैध पक्के लायसन्स/पासपोर्ट व तीन फोटो

↓

सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी/ उप प्रादेशिक परिवहन अधिकारी